ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) [Yr. 2016]

ISRJ Indian Streams Research Journal

# मुस्लीम मराठी कादंबरीचे स्वरूप

डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक ,मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

**प्रस्तावना :**
१९६० नंतर मराठी साहित्यात विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी असे साहित्य प्रकार जोरकसपणे पुढे आले. वाङ्मयीन वर्तुळात त्यावर चर्चा ही झाली. वेगवेगळ्या नियत कालिकेत यावर लेखन झाले. शिवाय चर्चासत्रामधून त्यावर भाष्य करण्यात आले. वेगवेगळ्या विद्यापीठात



अभ्यासक्रमात या प्रवाहाचा समावेश झाला. या प्रकारचा समांतर मुस्लीम साहित्य प्रवाह ही निर्माण झाला. हा प्रवाह विविध अंगाने समृद्ध झाला आहे. कथा, कादंबरी, काव्य, आत्मकथन, आत्मचरित्र, अशा सर्व वाङ्मय प्रवाहांनी हा साहित्य प्रवाह समृद्ध झाला आहे. मुस्लीम मराठी कादंबरीने मराठी साहित्य विश्व समृद्ध केले आहे.

## मुस्लीम कादंबरीची पार्श्वभूमी

आजूबाजूच्या परिसर लेखकाचे व्यक्तिमत्त्व घडवत असतो. लेखक ज्या पर्यावरणामध्ये वाढतो त्या पर्यावरणातील घटक लेखकाच्या साहित्यकृतीत येत असतात. देशाची फाळणी झाली, अनेक लोकांचे स्थलांतर झाले. परंतु काही मुस्लीम बांधवांनी आपली भूमी सोडली नाही. त्यांची नाळ या भूमिशी घट्ट बांधली गेली. या भूमीची भाषा संस्कृती तीने स्वीकारली. इथल्या भूमिच्या चालीरिती, परंपरा त्याने स्वीकारले ही भूमी माझी आहे. त्याची ही धारणा होती. पण इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने त्याना आपले म्हणून पाहिले नाही. त्यांच्याकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जावू लागले. यांची खंत इथल्या मुस्लिमांच्या मनात होती. शिवाय सावली सारखे बरोबर असणारे दुःख, दारिद्र्य, भूक, उपासमार ही होतच. मात्र पिचलेला समाज साहित्याच्या केंद्रस्थानी आला नाही. प्रस्थापितांनी मराठी कादंबरीत त्याचे चित्रण वास्तवपणे केले नाही. उलट गुंड मवाली दरोडेखोर, अशी खलनायक पात्रे निर्माण करून वाचकाचे मनोरंजन केले. आपले खरेखुरे जीवन साहित्यात यायला हवे असे मुस्लीम प्रतिभावंतांना वाटू लागले. याचाच परिपाक म्हणून सय्यद अमिन यांनी मुस्लीम मराठी साहित्य हे नियतकालिक १९३६ साली सुरू केले.

कथा, कविता स्फूटलेखन याना प्रसिद्धी मिळू लागली. समाजाचे दुःख लोकासमोर येवू लागले. परंतु कालांतराने ते नियतकालीनक बंद पडले. १९७० साली हमीद दलवाई यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. सांस्कृतिकदृष्ट्या हे मोठे काम होते. कारण या मंडळाच्या मुळाशी म. फुले या महापुरूषाचा विचार होता. या नव विचाराचे जसे स्वागत झाले तसे मुस्लीम समाजातून या मंडळाला विरोध ही होवू लागला. त्यातच २४ व २५ मार्च १९८५ ला मुस्लीम मराठी साहित्य परिषदेने साहित्य संमेलन घेतले. या संमेलनामध्ये मुस्लीम साहित्यावर चर्चा झाली शिवाय नव्या लेखकाना विचार मांडण्यासाठी विचारपीठ मिळाले. या संमेलनाने मुस्लीम लेखकांना आत्मशोधाची जाणीव करून दिली. त्यातून मुस्लीम कथा कविता कादंबरी असे वाङ्मय प्रकार आकारास येवू लागले.

## मुस्लीम मराठी कादंबरीच्या प्रेरणा

मोहम्मद पैंगबर यांचे विचार हे मुस्लीम मराठी कादंबरीची प्रेरणा आहे. मो.पैंगबर यांचा मानवतावादी विचार, समता, शांती, अहिंसा हा विचार या कादंबरीची प्रेरणा आहे. शिवय हमीद दलवाई यांनी स्थापन केलेले मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या मुळाशी म. फुले यांचा विचार होता. म. फुले यांची विचारधार मुस्लीम मराठी कादंबरीच्या मुळाशी आहे. म. फुले यांचे शिक्षण, विज्ञाननिष्ठ, सत्य, अहिंसा असे मोलाचे विचार मुस्लीम मराठी कादंबरीने स्वीकारले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे म. फुले यांना आपल्या गुरूस्थानी मानत होते. स्वभाविकच या महापुरूषांच्या विचाराचा धागा मुस्लीम मराठी कादंबरीशी निगडीत आहे. शिवाय सुफी संताचे काव्य याचा आदर्श ही मुस्लीम मराठी कादंबरीच्या पुढे आहे. एकूणच मो. पैगंबर, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सूफी संत अशा महापुरूषांचे विचार व लेखन हे मुस्लीम मराठी कादंबरीच्या प्रेरणा आहेत.

## मुस्लीमाची व्याख्या

मुसलमान व त्याने निर्माण केलेले साहित्याची व्याख्या करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला आहे. मुस्लीम साहित्य नेमके कोणास म्हणावे याविषयी साहित्यिकामध्ये एक मत नाही. त्यातही अयुब शेख व डॉ. शकिल शेख यांच्या व्याख्या सर्वसमावेशक आशा वाटतात. 'कोणत्याही साहित्यिकांनी मुस्लीम समाजाच्या सुख–दुःखाचे सामाजिक व मानसिक स्थितीचे वास्तववादी विवेचन मराठी भाषेत मांडले आहे. त्यास मुस्लीम मराठी साहित्य म्हणावे असे मत अयुब खान यांनी नोंदविले आहे. तर डॉ. शकिल शेख म्हणतात, त्याप्रमाणे जन्माने मुस्लीम असलेल्या किंवा कालांतराने मुस्लीम धर्म स्वीकारलेले मराठी भाषिक लेखकाने मुस्लीम समाजजीवनाचे चित्रण आपल्या मानसिकतेसह स्पष्ट केले आहे. त्यास मुस्लीम मराठी साहित्य असे म्हणावे. वरील व्याख्यांवरून असे म्हणता येईल की, जे जीवन जगले आहे, भोगले आहे, अनुभवले आहे. ते जीवन प्रामाणिकपणे वास्तवपणे साहित्यात आणले आहे. त्या साहित्यास मुस्लीम मराठी साहित्य म्हणावे डॉ. शकिल शेख, रफिक सुरज, फ. म. शहाजिंदे अशा लेखकांच्या कादंबऱ्यामधून मुस्लीम जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे.'

## मुस्लीम मराठी कादंबऱ्या

मराठी मुस्लीम कादंबऱ्यामध्ये 'मी तू' ही वेगळेपणा जपणारी फ. म. शहाजिंदे यांची कादंबरी आहे. ही पत्रात्मक कादंबरी प्रेमभान व्यक्त करणारी आहे. तिच्या मुखपृष्ठावर काव्याची ओळ लिहिली आहे. ती अशी,

'तुडंबल्या ह्रदयी तुझ्या आठवणी
जसे अम्बर भरभरून यावे
हसत राहणार नसशील तर
फाटणारे काळीज कसे सांधावे
हलक्या पावली ये भर्रकन
जसे साध्वीने राऊळी प्रवेशावे
सांजवताना तुझ्या गावाच्या दिशेने
मी फक्त शब्दांना धुंडाळावे'

ह्या काव्याच्या ओळी 'मी तू' कादंबरीच्या मुखपृष्ठावर आहेत. यातून या कादंबरीच्या केंद्रस्थानी प्रेमभाव आहे. हे वाचकाच्या लक्षात येते. मराठी साहित्यात अशा पत्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत, पण या पत्रात्मक कादंबरीत केवळ

प्रेमभावच व्यक्त झाला आहे. असे नाहीतर अनेक सामाजिक संदर्भ ही या कादंबरीत सहजपणे आले आहेत. रेणू हनीफ यांच्या संवादातून ही कादंबरी साकार झाली आहे. प्रेमातील हर्ष, दुःख त्यातही विफलतेची जाणीव होणारे तीव्र दुःख लेखकाने आपल्या संवेदनशील मनाने टिपले आहेत. दोन प्राध्यापकांच्या जीवनातील हे प्रेमभाव वाचकांना अंतर्मुख करतात. कादंबरी वाचताना वाचक हळूहळू हनीफच्या भावभावनेशी एकरूप होऊन जातो. हेच या कादंबरीचे बलस्थान आहे. प्रेम म्हणजे काय? या प्रश्नाची उकल सहजपणे होत जाते. आपल्या मनातील भाव पत्रातून व्यक्त करताना लेखकाच्या हातून जीवनाला हवे असणारे तत्त्वज्ञान या कादंबरीत आले आहे. रविंद्रनाथ टागोर, चक्रधर, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव अशा संतांच्या विचाराचे दाखले लेखकाने दिले आहेत. शिवाय काही पौराणिक आख्यायिका ही आल्या आहेत. त्यामुळे या कादंबरीची वाचनियता वाढली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भाषा शैलीच्यादृष्टीने ही कादंबरी खूप महत्त्वाची आहे. शहरी, ग्रामीण जीवनातील भाषा या कादंबरीत अवतरली आहे.

हमीद दलवाई यांची 'इंधन' ही कादंबरी अनेक अर्थाने महत्त्वाची आहे. कोकणची पार्श्वभूमी या कादंबरीला लाभली आहे. लेखक हा पुरोगामी विचाराचा आहे. समाजाबद्दल त्याला आंतरिक तळमळ आहे. समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी–परंपरा या बंद व्हायला हव्यात असे लेखकाला मनापासून वाटते. अगदी तटस्थपणे लेखकाने कादंबरीचे लेखन केले आहे. खोत कुळवाडी, मुस्लीम बौद्ध असे सगळे गुण्यागोविंदाने गावात राहत असतात. एकमेकांच्या मदतीला धावून जात असतात. ग्रामीण जीवन हळूहळू बदलते. विकासाच्या नावाखाली अनेक प्रश्न निर्माण होतात, ह्या अत्यंत गुंतागुंतींच्या प्रश्नाकडे लेखकाने संवेदनशील मनाने पाहिले आहे. फाळणी झाल्यानंतर हिंदू–मुस्लीम समाजामध्ये तेढ निर्माण झाली.

मुस्लीम समाजाकडे लोक संशयती नजरेतून पाहू लागले. त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराची घोषणा केली. बौद्ध, स्वाभिमानाची स्वातंत्र्याची आपल्या हक्काची भाषा बोलू लागले. त्याची अस्मिता जागृत झाली. याचाही परिणाम खेड्यातील जनजीवनावर होऊ लागला. वरवर शांत दिसणारे खेडे आतून धूमसू लागले. असे खेडे लेखकाच्या डोळ्यासमोर आहे. ही कादंबरी आत्मनिवेदनात्मक आहे. लेखक आजारपणातून १५ वर्षानंतर आपल्या गावी येतो. त्याला खेड्यात अनेक बदल दिसतात. लोक पूर्वीसारखे लेखकाबरोबर वागत नाहीत तर फटकून वागतात. लेखकाला या तुटलेपणाची जाणीव होत राहते. निवेदकाचा भाऊ इसाक शाळेत शिक्षक असतो. शाळेत सुमी नावाची विद्यार्थीनी असते. इसाक तिच्या प्रेमात पडतो. इसाक व सुमतीचे प्रेमप्रकरण गावात चर्चेचा विषय होतो. सुमतीच्या चुलत भावाला हे प्रेमसंबंध सहन होत नाही. पण प्रत्यक्ष तो इसाकला काही करू शकत नाही. मग तो कटकारस्थाने रचत राहतो. त्यातच कुळवाडी यांच्यात भांडणे होतात. इथे पहिली संघर्षाची ठिणगी पडते. गावाच्या ऐक्याला पहिला सुरंग लागतो. त्यातच दुसरा इसाक आफ्रिकेतून येतो. त्याच्याकडे पुष्कळ संपत्ती असते. तो श्रीमंत म्हणून गावात वावरत असतो. गावात मोक्याच्या ठिकाणी त्याने घराचे बांधकाम काडलेले असते. बांधकाम बरेच दिवस चालू असते. त्या बांधकामावर लक्ष्मी नावाची बौद्धाची बाई कामाला असते. इसाकचे व लक्ष्मीचे संबंधाची गावात चर्चा सुरू होते. एकेदिवशी लक्ष्मीचा पती लक्ष्मीला घेण्यासाठी येतो. पण लक्ष्मी त्याच्याबरोबर जाण्यासाठी तयार होत नाही. तो स्पष्ट नकार देते. इसाक लक्ष्मीची बाजू घेतो. यातून मुस्लीम व बौद्ध यांच्यात संघर्ष होतो. लेखकाला हा संघर्ष नको असतो. तो सर्वांना समजावण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचे कोणच ऐकत नाही. त्यातच सुमतीच्या भावाला संघर्ष पेटविण्याची संधी मिळते. तो दंगली पेटविण्यासाठी कटकारस्थाने रचतो. गावात पालकीची मिरवणूक काढली जाते. या पालकीला हिंदू–मुस्लीम दोन्ही धर्माची माणसे मानत असतात. पालकी विषयी त्यांच्या मनात आदर असतो. पण यावेळी पालकी मिरवणूकीत दंगल घडवायची असा बेत सुमतीचा चुलतभाऊ रचतो. ब्राह्मण, बौद्ध या सर्व जाती एका बाजूला व मुस्लीम एका बाजूला असा संघर्ष उभा राहतो व मिरवणुकीत दंगली घडवतात. अनेक लोकांचा बळी जातो. महिलांवर अत्याचार होतो. एकोप्याने राहणारा गाव उद्ध्वस्त होतो. असे या कादंबरीचे कथानक, परवीन, सुदाम इसाक, लक्ष्मी अशी पात्रे वाचकाच्या दीर्घकाळ लक्षात राहतात. हिंदू–मुस्लीम दंगलीला गावातूनच कसे इंधन पुरवले जाते. याचे चित्रण ही कादंबरी करते. धर्माच्या नावावरून घडणाऱ्या दंगली खेड्यातील विकासाला कशा मारक ठरतात याचे चित्रण लेखकाने अगदी तटस्थपणे केले आहे. ग्रामीण जीवनात जाती–धर्माचे त्यातील ताण–तणावाचे लेखकाने अगदी वास्वतपणे चित्रण केले आहे.

जुबा ही शकील शेख यांची कादंबरी. या कादंबरीचे शीर्षक खूपच बोलके व सुचकतेचे आहे. जुबा शब्दाचा मराठीत अर्थ ईश्वराला बळी देणे असा होतो. देवाला बळी देणे ही प्रथा आदिम काळापासून आपल्याकडे चालत आली आहे. हैद्राबादच्या मुक्ती संग्रामात अनेक बळी गेले. हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा इतिहास हा रक्तरंजित असा इतिहास आहे. या मुक्ती संग्रामात अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. लोक बेघर झाले. स्त्रियांवर अत्याचार झाले. मुक्ती संग्रामात झालेली ही हींसा जुबा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. मुस्लीम समाजाची जीवघेणी वेदना शकील शेख यांनी शब्दबद्ध केली आहे. कादंबरी

कथानक कुलाली या गावात घडते. या गावात हिंदू-मुस्लीम लोक गुण्यागोविंदाने राहत असतात.पण मलकप्पा पाटील आणि कल्लप्पा पाटील हे दोन प्रतिस्पर्धी असतात. गावात आपला दरारा रहावा, आपल्याला मानसन्मान मिळाला पाहिजे. ही दोघांची मनोवृत्ती असते. ते दोन्ही एकमेकांच्या विरोधात असतात. मलकप्पा पाटील याला गावाविषयी तळमळ असते, पण त्याचा मुलगा सिद्धाराम गुंड प्रवृत्तीचा असतो. कल्लप्पाची वृत्ती ही गुंडाची असते. त्याची गावभर दहशत असते. लोक त्याला घाबरत असतात. गुरू लिंगप्पा पेशाने शिक्षक असतो. गावातील लोक त्याला मानसन्मान देत असतात. याच गावात अलिसाब, पीरसाब, चाँदसाब, रसूल आणि खुतबू अशी मुसलमानांची पाच कुटुंबे राहत असतात. रोज शेतमजुरी करून कसे तरी आपले कुटुंब पोसत असतात. गावावर त्याचे प्रेम असते. गावातील ते प्रत्येकाबरोबर सौजन्याने वागत असतात. अचानक रझाकाराने हिंदू धर्माच्या कतली केल्या. सिद्धाराम हे दंगलीचे लोन आपल्या गावात आणतो. आपल्या गावातील मुसलमानाचा संहार करतो, त्यात अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात. याचे भेदक व वास्तव चित्रण या कादंबरीत येते. सिद्धाराम हा स्फोटक भाषणे देवून लोकांची माथी भडकवतो. मुस्लीम रझाकार सेनेला विरोध करण्यासाठी गावात सभा बोलावतो. गुलामाचे जगणं सोडून द्या. हातात शस्त्र घ्या. तोच आपला धर्म आहे. आपली घरं लुटली जातात. स्त्रियांवर अत्याचार होतात, मग तुम्ही गप्प कसे बसता. अशी भावनिक साद घालतो. लोकही भडकतात गुरूलिंगप्पा भाषणाला विरोध करतो. गावातील मुसलमानाचा आणि रझाकाराचा निजामाचा काहीही संबंध नाही. आपण येथे गुण्यागोविंदाने राहतो, असे तो समजावून सांगतो. पण त्याचे ऐकत नाही. पण सिद्धारामाला आवडत नाही. तो खुतबूच्या मोठ्या मुलाला ठार करतो. त्यावरच तो शांत बसत नाही. तर तो खुतबूचाही काटा काढतो, त्याचे प्रेत धान्याच्या पेवात ठेवतात. दोघांच्या मृत्यूचा धसका घेवून खुतबूची बायको मरण पावते. सलीम भितीने पळून जातो. आपण शांत बसणार नाही याचा बदला घेऊ असे तो बोलतो. एकेदिवशी येवून तो सिद्धारामचा पाय तोडतो. पण त्याचे साथीदार सलीमची हत्या करतात. असे या कादंबरीचे कथानक ठसठसीत आहे. कादंबरीतील पात्रे हिंदू-मुस्लीम अशी संमिश्र भाषा, नेटके संवाद लेखकाचे मनाला स्पर्श करणारे निवेदन अशा गुणांनी ही कादंबरी समृद्ध झाली आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजाशी संघर्ष करणारा मुसलमान त्याचे अठराविश्व दारिद्र्य, त्यांच्या कुटुंबातील असणारे एकमेकांशी नाते लेखकाने खूप उत्तमरित्या मांडले आहे. हिंदू-मुस्लीम यांनी एकोप्याने राहिले तर कुटुंबाबरोबर गावाचाही विकास होईल, गावात शांतता राहिल. एकमेकांबद्दल प्रेम राहिल. असा मानवतेचा, प्रेमाचा, करूणेचा संदेशही कादंबरी देते.

'रहबर' ही रफीक सूरज यांची कादंबरी प्रसिद्ध आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी प्रकाश टाकते. शिक्षणाचे झालेले खाजगीकरण त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नावर या कादंबरीने भाष्य केले आहे. सलीम मुजावर हा कादंबरीचा नायक येणाऱ्या प्रत्येक संकटाला पायाखाली घेत तो आपले शिक्षण पूर्ण करतो. कशीतरी तासिका तत्वावर तो प्राध्यापकाची नोकरी मिळवतो. मुळातच बेभरवशाची असणारी नोकर तो प्रामाणिकपणे करतो. कुटुंबातील आर्थिक ताण-तणाव नोकरीचा ताण-तणाव सगळ्या बाजूने त्याची कोंडी होते. तो हतबल होतो. तो प्राध्यापक असल्याने नव्या बदलाना विचाराना तो स्वीकारतो, तर कुटुंबाची विचारसरणी ही पारंपारिक असते. इथेही दोन विचारांचा संघर्ष सुरू होतो. त्यातही त्याच्या इच्छेविरूद्ध त्याला लग्न करावे लागते. शिवाय आणखी एका मुलीचा भार त्याच्यावर पडतो. या सर्वामुळे त्याची खूपच ओढाताण होते. विशिष्ट परिस्थितीच्या भोवऱ्यात तो सापडतो. मार्ग सूचत नाही. या सर्व व्यापातून बाहेर निघण्यासाठी तो तबलिग जमातीमध्ये जाण्याचा निर्णय घेतो. ईश्वरभक्ती करावी असे त्याला वाटत राहते. त्यातच त्याला मानसिक समाधान मिळते, असे ह्या कादंबरीचे कथानक आहे.

जागतिकीकरणानंतर ग्रामीण जीवनामध्ये जो बदल झाला, त्याचा परिणाम सर्व घटकांवर झाला. तसा शिक्षकावरही झाला. शिक्षणाचे खाजगीकरण झाले. भांडवलदार लोकांच्या हातात शिक्षण गेले. परिणामी शिक्षणाची दुकानदारी सुरू झाली. शिक्षणाचे मूल्य हरवले आहे. याचा सर्वात मोठा परिणाम खेड्यातील युवकावर झाल्यामुळे शिकून बेकार झाली. एका जागेसाठी शंभर अर्ज येवू लागले. त्यातच गुणवत्तेपेक्षा डोनेशनला महत्त्व प्राप्त झाले. मग मिळेल तशी नोकरी स्वीकारणे व ती टिकवणे एवढेच युवकाच्या हाती राहिले. त्याच्या जगण्यातला ताण-तणाव या कादंबरीत आला आहे. छोट्या छोट्या घटनातून कादंबरी पुढे सरकत जाते. वाचक शेवटपर्यंत कादंबरीत गुंतून राहतो, हे या कादंबरीचे यश आहे.

राजन खान यांच्या काफर, शरियत, यतीम, मजार जातवन, विनशन या कादंबऱ्यामधून मुस्लीम समाजाची मानसिकता चित्रित झाली आहे. मोहम्मद अन्वरखान यांची श्रद्धा महंमद नैसर्गी यांची आत्मवंचना, मुनीर शेख यांची कलंकमुक्ती, हिदायत खान यांची जाकेर, इक्बाल हसरत यांची अढळा पेटली, ए. के. मुतवल्ली यांची चढेल गाव इत्यादी कादंबऱ्यामधून मुस्लीम समाजामध्ये अंधश्रद्धा, अज्ञान, दुःख, दैत्य, दारिद्र्य, भूक, उपासमार यावर लेखकानी प्रकाश टाकला

आहे. या लेखकांनी आपल्या कादंबरी लेखनाचे मुस्लीम साहित्याचा प्रवाह समृद्ध केला आहे. जातीधर्माच्या वर्चस्वाखाली दबलेला मुस्लीम समाज, त्याचे अज्ञान, रूढी परंपरेला चिकटून राहणे, नव्या बदलाला सामोरे जाणे, टिकून राहणे, असा मुस्लीम समाज त्यागाची, प्रेमाची, बलिदानी, श्रमाची अशी देणगी दिली आहे. शिवाय व्यापार विषयक दृष्टीकोन दिला आहे. देशातील प्रेमाची प्रतीक (ताजमहाल) मुस्लिमांनी दिली आहेत. अशा मुस्लीम समाजाच्या सकारात्मक बाजू मराठी मुस्लीम कादंबऱ्यात यायला हव्यात असे झाल्यास मराठी मुस्लीम कादंबऱ्याच्या कक्षा रूंदावतील व एका नव्या जगाची ओळख वाचकाला होईल.

## संदर्भः–

१)शेख शकिल, जुबा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २०१४.
२)शहाजिंदे फ. म., मुस्लीम मराठी साहित्यः परंपरा स्वरूप आणि लेखकसूची, भूमी प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती २००४.